# प्रशासनातील "दिपस्तंभ"

## *राज्यात जिल्हा नियोजन विभागाला जळगावात प्रथमच आयएसओ मानांकन.*

उत्पादन असो की, सेवा त्याची गुणवत्ता वाढून जागतिक गुणवत्तेचा दर्जा प्राप्त करण्यासाठी प्रत्येक संस्थेची धडपड चालू असते. यासाठी जागतिक दर्जा प्राप्त आयएसओ मानांकन मिळणे आवश्यक असते. आयएसओ मानांकन फक्त खाजगी कंपन्या किंवा कार्यालयालाच नव्हे तर शासकीय कार्यालयांनासूध्दा घेता येऊ शकते. जळगांव जिल्हयाच्या नियोजन कार्यालयाने हे मानांकन मिळविण्याचा विडा उचलला आणि कार्य कुशलतेच्या जोरावर राज्यातील जिल्हा नियोजन कार्यालयापैकी जळगांव जिल्हा नियोजन कार्यालयाने सर्वप्रथम आयएसओ मानांकन मिळविले आहे. आता जिल्हाधिकारी कार्यालयाचे देखील याच मार्गाने वाटचाल सुरु आहे. जनमानसात सरकारी कार्यालयाबाबत लालफितीशाई, सरकारी काम सहा महिने थांब अशीच भावना असते. जनमानसातील ही भावना बदलण्याचा प्रयत्न करणे आवश्यक असते. ही भावना कशी चूकीची आहे हे लोकांना कृतीतून पटवून देण्यासाठी जिल्हाधिकारी विजय सिंघल यांनी विशेष प्रयत्न केले. यासाठी प्रारंभी जिल्हयाला वर्षानुवर्षे भेडसावणाऱ्या पाणी प्रश्नावर मात करण्यासाठी एक पाऊल म्हणून नदीजोड प्रकल्प त्यांनी यशस्वी करुन दाखविला ते आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर पोहोचला व आता ऑस्ट्रेलियातील आयएसओ प्रमाणिकरण करणाऱ्या आयएसपी प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने जिल्हा नियोजन समितीस उत्कृष्ट कार्यसंस्कृतीचा मानदंड ठरत आयएसओ ९००१-२००० प्रमाणपत्र प्राप्त केले आहे.

जिल्हाधिकारी विजय सिंघल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा नियोजन अधिकारी किशोर पाटील यांनी कार्यालयात येणारे सर्व प्रकरणे वेळीच निकालात निघतील यासाठी कार्यपध्दती निश्चित केली. त्यासाठी जिल्हा नियोजन अधिकारी यांनी ही विशेष प्रयत्न केले. सुमारे दोन वर्षापूर्वी आयएसओ ९००१-२००० प्रमाणपत्र मिळवण्याचा दृष्टीने त्यांनी प्रयत्न सुरु केले. सुरुवातीस आयएसओ ९००१-२००० ची गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली ज्या आठ व्यवस्थापन तत्वांवर आधारलेली आहे ती तत्वे आपल्या कार्यालयीन पध्दतीस लागू कशी करता येतील याबाबत विचार सुरु झाला. ग्राहकाभिमुखता, नेतृत्व, कर्मचाऱ्यांचा सहभाग, प्रक्रियाभिमुखता, पध्दतशीर व्यवस्थापन करणे, निरंतर सुधारणा, वस्तुस्थितीनुसार निर्णय घेणे, परस्पर संबंध या तत्वांना अंगिकारतांना कार्यालयातील सहकाऱ्यांचा सहभाग घेऊन कामास सुरुवात केली. ही कामे करतांना संस्थेची कार्यपध्दती नियोजनबध्दरितीने आखली, तिची अंमलबजावणी करायला सुरुवात केली, कामकाजाची कार्यपध्दतीची नियमितपणे वारंवार तपासणी केली आणि त्यात काही दोष, उणिवा आढळल्यास तर त्या सुधारण्याकरीता योग्य उपाय बदल शोधून काढून ते अंमलात आणले. कार्यपध्दतीचे हे सतत चालणारे चक्र असते.

नियोजन कार्यालयाव्दारे मुख्यत्वे जिल्हयातील विविध खाते प्रमुखांशी समन्वय ठेवून जिल्हयाची वार्षिक योजना तयार करणे, जिल्हा नियोजन समितीच्या बैठका आयोजित करणे, खासदार स्थानिक विकास कार्यक्रम, आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम, डोंगरी विभाग विकास कार्यक्रम व प्रादेशिक पर्यटन विकास कार्यक्रम हे लोकप्रतिनिधींच्या आणि जनतेच्या जिव्हाळयाचे विषय राबविले जातात. जिल्हयाच्या विकासात नियोजन विभागाच्या कार्यकुशलता व कृतीशिलतेचा मोठा वाटा असतो. सर्व विकास कामांचे सुसूत्रिकरण करुन त्यांचे नियोजन केले जाते. या सर्व बाबींची आयएसओ प्राप्तीच्या दृष्टीने सुत्रबध्द साखळी गुंफून आयएसओ प्रणाली घेण्यासाठी शासनाच्या नियोजन विभागाची परवानगी घेण्यात आली. सर्व प्रक्रियांचे लेखन करुन प्रक्रिया व गुणवत्ता पुस्तिका तयार करण्यात आली. आयएसओ ९००१-२००० प्रमाणिकरण करणाऱ्या कंपनीकडून निविदा मागवून आयएससी सर्टिफिकेशन प्रा.लि. ऑस्ट्रेलिया या कंपनीची निवड करण्यात आली.

हे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी खाजगी सल्लागार न नेमता मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक यांनी सल्ला देण्याचे मान्य केले. त्यांच्या कार्यालयातील शाखा अभियंता डी.टी. महाजन, लिड ॲसेसर यांनी सल्लागार म्हणून महत्वपूर्ण मार्गदर्शन केले. त्यासाठी महाजन यांनी कार्यालयात दोन दिवस प्रशिक्षणही घेतले. अंतर्गत लेखा प्रशिक्षण व गुणवत्ता व्यस्थापन विषयावर बैठक घेतली. हे करत असतांना कार्यालयात अडगळ वाटावे असे मोडकळीस आलेले १९७२ पासूनचे जुने फर्निचर निकाली काढून कार्यालयातील बैठक व्यवस्था सुधारण्यात आली. प्रत्येक कर्मचाऱ्याच्या कार्यभार विचारात घेऊन प्रत्येकाने करावयाचे कार्य निश्चित करण्यात आले. कार्यालयातील टंकलेखन यंत्राचा वापर बंद करुन प्रत्येक अधिकारी, कर्मचाऱ्यांनी स्वतः संगणकावर काम करणे बंधनकारक केले. टिपणी, पत्र मसुद्याचा दर्जा उंचावण्यासाठी यशस्वी प्रयत्न केले. कर्मचाऱ्यांना वारंवार प्रशिक्षित करुन अ,ब,क,ड प्रमाणे सर्व अभिलेखाची वर्गवारी करण्यात आली आणि अनावश्यक कागदपत्रे नष्ट केली आणि प्रकरणे वेळीच निकाली निघू लागली. आयएसओ प्रमाणपत्र देतांना महत्वाचा निकष म्हणजे स्वतःमधील, स्वतःच्या कार्यपध्दतीचा दोष, उणिवा शोधून त्यावर इलाज शोधून ते दुरुस्त करण्याइतपत आपला उद्योग किंवा आपली संस्था प्रगल्भ झाली आहे किंवा नाही हे तपासले जाते. या सर्व बाबींचे लेखा परिक्षण झाले. अंतर्गत लेखा परिक्षणात निघालेल्या प्रणालीशी असंगत बाबी दूर करण्यात आल्या. कंपनीने दिनांक १४ नोव्हेंबर २००६ रोजी लेखा परिक्षण केले. त्यानंतर कंपनीने दिनांक ११ डिसेंबर २००६ रोजी जिल्हा नियोजन कार्यालयास आयएसओ ९००१-२००० हा गुणवत्तेचा आंतरराष्ट्रीय दर्जा प्रदान केला.

आयएसओ ९००१-२००० प्रमाणपत्र मिळविणे म्हणजे आता आपली कार्यपध्दती निर्दोष झाली, सर्वोत्तम झाली असा आपला दावा नसल्याचे जिल्हाधिकारी विजय सिंघल आणि नियोजन अधिकारी किशोर पाटील यांनी सांगून उलट ही एक सुरुवात आहे असेच आपण मानतो. निर्दोष सातत्यपूर्ण उच्च दर्जाची कार्यपध्दती कायम टिकवून धरण्याच्या दृष्टीने उचललेले हे पहिले एक महत्वाचे पाऊल आहे. जनतेच्या दृष्टीने या संस्थेला एक मानाचे स्थान मिळालेले आहे. जनतेच्या अपेक्षांचे प्रेरणादायक आपल्याला मिळाले असल्याचे सांगून भविष्यात जनतेची कामे अधिक वेगात व कुशलतेने करण्याचा प्रयत्न असेल असेही ते म्हणाले.

## शासनाकडून अभिनंदन.

जळगांव जिल्हा नियोजन समितीस आएसओ प्रमाणपत्र मिळाल्याबध्दल राज्याचे वित्त व नियोजन मंत्री मा.श्री.जयंतराव पाटील यांनी एका पत्राव्दारे जिल्हाधिकारी विजय सिंघल व नियोजन अधिकारी श्री.किशोर पाटील यांचे अभिनंदन केले आहे. तसेच श्री.विजय कुमार अग्रवाल,प्रधान सचिव,नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई यांनी सुध्दा अभिनंदन केलेले आहे. जिल्हा नियोजन विभागाची दैनंदिन कामकाज विहित कालमर्यादेत व गुणवत्तापूर्ण होण्याच्या दृष्टीने कामाचे सुसूत्रिकरण करण्याचे विशेष प्रयत्न जिल्हाधिकारी श्री.सिंघल यांनी केले आहेत. त्याबध्दल त्यांचे व त्यांच्या अधिनस्त सर्व अधिकारी, कर्मचारी अभिनंदनास निश्चितच पात्र आहेत. हा प्रकल्प राज्यभर लागू करण्याच्या दृष्टीने परिपूर्ण प्रस्तावाची सी.डी.किंवा प्रतही क्ष्यांनी मागीतले आहे. जेणेकरुन प्रत्येक जिल्हयात याचे अनुकरण करता येईल.

**(एम. टी. गावीत)**
**जिल्हा माहिती अधिकारी, जळगांव**